
स्थलांतर करणारे प्राणी


कैरोलीन अर्नोल्ड

चित्र: मिशेल ज़िलमैन

अनुवाद – मानसी महाजन



काही प्राणी कायम एकाच ठिकाणी राहतात. उदाहरणार्थ वुडमाउस आपल्या बिळापासून एक यार्डापेक्षा जास्त अंतरावर कधीही जात नाही. काही प्राण्यांना दोन घरे असतात आणि त्यांना एका घरातून दुसऱ्या घरी जाण्यासाठी हजारो मैल स्थलांतर करावे लागते. या पुस्तकातून कॅरोलिन अरनॉल्ड सात प्राण्यांच्या स्थलांतराच्या सवयींवर एक नजर टाकतात. त्यापैकी काही सवायी अतिशय विलक्षण, जवळजवळ अविश्वसनीय आहेत. या प्राण्यांच्या लीला वाचून वाचक नक्कीच अचंबित होतील.




स्थलांतर करणारे प्राणी

कैरोलीन अर्नोल्ड

चित्र: मिशेल ज़िलमैन

अनुवाद – मानसी महाजन



काही प्राणी कायम एकाच ठिकाणी राहतात. उदाहरणार्थ वुडमाउस आपल्या बिळापासून एक यार्डापेक्षा जास्त अंतरावर कधीही जात नाही. काही प्राण्यांना दोन घरे असतात. अनेकदा हे प्राणी एका घरातून दुसऱ्या घरी जाण्यासाठी खूप लांब प्रवास करतात. आपण म्हणतो की हे प्राणी ‘स्थलांतर’ करतात.





पक्षांचे स्थलांतर अनेकांना माहीत असते.

बदके आणि इतर पक्षी दर वर्षी शरद ऋतूत दक्षिणेकडे जातात.

तुम्ही राहत असाल तिथे आकाशातून त्यांना उडत जाताना तुम्ही पाहिलेही असेल.

वसंत ऋतू आला की पुनः उत्तरेकडे परत जातात.

इतरही अनेक प्राणी स्थलांतर करतात.

किडे सुद्धा स्थलांतर करतात, महित्ये?

काही मासे स्थलांतर करतात.

सरपटणारे प्राणी, सस्तन प्राणी, माणसेसुद्धा स्थलांतर करतात.

प्राणी का बरे स्थलांतर करत असतील?

याची अनेक करणे आहेत.

काही हवामानामुळे स्थलांतर करतात.

त्यांचे उन्हाळ्यातले घर हिवाळ्यात खूप गार होते म्हणून, किंवा हिवळ्यातले घर उन्हाळ्यात खूप गरम होते म्हणून.

काही प्राणी पिल्लांना जन्म देण्यासाठी स्थलांतर करतात.

पिल्लं सुरक्षित राहतील अशा जागी जातात.

कधी अन्नासाठीही स्थलांतर करतात.





काही प्राणी हजारो मैल प्रवास करतात.

समुद्र आणि डोंगर पार करून जातात.

भयानक वादळांमधून वाट काढत जातात.

आर्क्टिक टर्न नावाचा पक्षी दर वर्षी विलक्षण प्रवास करतो.

उन्हाळ्यात टर्न पक्षी उत्तर ध्रुवाजवळ राहतात.

घरटी बांधतात आणि पिल्लांना मोठे करतात.



ऑगस्ट मध्ये हवामान थंड होऊ लागते.

उत्तर ध्रुवावर हिवाळा असतो तेव्हा दक्षिण ध्रुवावर उन्हाळा असतो.

आर्क्टिक टर्न पक्षी उत्तर ध्रुवपासून दक्षिण ध्रुवापर्यंत उडत प्रवास करतात.


जवळजवळ 11000 मैलाचा प्रवास!

हा प्रवास पूर्ण करायला अनेक महीने लागतात.


मग थोड्याच महिन्यात दक्षिण ध्रुवावरचा उन्हाळा संपतो.

आता हे पक्षी परत उत्तर ध्रुवावर जेल निघतात.

दर वर्षी हा आर्क्टिक टर्न पक्षी तब्बल 22000 मैल प्रवास करतो!







इतर प्राणी यापेक्षा बऱ्याच कमी प्रवास करतात.

काही हरणे उन्हाळ्यात उंच डोंगरावर राहतात.

मात्र हिवाळ्यात गवतावर बर्फ साठते.

बर्फ आणि वाऱ्यामुळे तिथे जगणे धोक्याचे असते.

मग ही हरणे दऱ्यांमध्ये उतरतात.



अनेक प्रकारची फुलपाखरे सुद्‌धा स्थलांतर करतात.

त्यातले ‘मोनर्क’ फुलपाखरू सर्वांना माहीत आहे.

काळे-नारंगी असे हे फुलपाखरू उन्हाळ्यात अमेरिका आणि कॅनडा मध्ये हमखास दिसते.

मात्र शरद ऋतूमध्ये ते स्थलांतर करते.


एक-एक फुलपाखरू प्रवास सुरू करते.

एकमेकांच्याबरोबर ही फुलपाखरे प्रवासाला निघतात.

हजारो फुलपाखरे एकत्र दक्षिणेकडे जाऊ लागतात.

एका दिवसात मोनर्क फुलपाखरू 80 मैल प्रवास करते.

रोज रात्री ते विश्रांतीसाठी थांबतात. काही मोनर्क तर हिवळ्यातले घर गाठण्यासाठी 2000 मैल प्रवास करतात!





पश्चिमेकडे राहणारी मोनर्क फुलपाखरे दक्षिण कॅलिफोर्नियात जातात.

पूर्वेकडे आणि मध्य अमेरिकेत राहणारी मोनर्क फुलपाखरे मेक्सिकोला जातात.

हिवाळ्यात ते मोठ्या संख्येने एकत्र येतात.

निश्चलपणे झाडांवरून लटकतात.

त्यांचे पंख मिटलेले असतात.

वाळलेली पानेच जणू!

मात्र वसंत ऋतूत त्यांचे पंख उघडतात.

झाडांवर हजारो नारंगी फुले फुलल्याचा भास होतो.

लवकरच फुलपाखरे उत्तरेकडे कूच करतात.

मोनर्क फुलपाखरचे आयुष्य जेमतेम एक वर्ष असते.

प्रत्येक फुलपाखरू एकदाच हा उत्तर-दक्षिण प्रवास पूर्ण करते.



चिनूक सॅमन नावाचा मासा अमेरिकेच्या पश्चिम समुद्रतटावर आढळतो.

हा मासा स्थलांतर करतो.

सॅमन माशाचा जन्म उथळ ओढ्यात होतो.

तिथे पिल्लं काही आठवडे राहतात.


आणि मग प्रवाहाबरोबर पोहू लागतात.

लवकरच हे मासे आपले जमनस्थळ, तो ओढा, सोडून देतात.

मोठमोठ्या नद्यांमधून पोहत शेवटी महासागरात पोचतात.

हा प्रवास जोखमीचा असतो.

धरणे, प्रदूषण, मोठे मासे सगळेच या सॅमन माशासाठी धोक्याचे असते.



सगळे सॅमन महासागरापर्यंत पोचू शकत नाहीत.

जे पोचतात ते तिथे फार तर पाच वर्ष राहतात.

800 मैल उलट प्रवास करत सॅमन मासा पुनः आपला जन्म झाला त्याच ओढ्यात परत येतो.

त्याला रस्ता कसा समजत असेल?

प्रत्येक नदी, ओढ्याला आपला असा एक गंध असतो.

सॅमन माशाला आपल्या ओढ्याचा गंध माहीत असतो.

तो त्या वासवरून परतीचा रस्ता शोधून काढतो.

परतीचा प्रवास आधीच्या प्रवासहूनही खडतर असतो.

सॅमन माशाला आता प्रवाहाच्या विरोधात पोहावे लागते.

सॅमन मासे ताकदवान असतात.

एवढा प्रवास करायचा तर ताकद हवीच!

ते वेगात पोहू शकतात. उंच उडी मारू शकतात.

त्यांना अनेकदा खंडकांवरून, धबधब्यांवरून उडी मारावी लागते.

अनेक सॅमन एकाच वेळी हा परतीचा प्रवास करतात.


शेवटी एकदाचे ते आपल्या घरी पोचतात.

त्यांची प्रजनन क्रिया सुरू होते.

नवे सॅमन मासे जन्माला येतात.

वयस्कर सॅमन मासे मरून जातात.

काहीच आठवड्यात हे नवीन सॅमन मासे महासगरकडे जाण्यासाठी निघतात.



ईल हा स्थलांतर करणार अजून एक मासा.

बरम्यूडा येथील सरगासो समुद्रात त्यांचा जन्म होतो, पण ते तिथे राहत नाहीत.

काही अमेरिकेला पोहत जातात.

काही यूरोपला.


अमेरिकेला पोचायला त्यांना एक वर्ष लागते.


यूरोपला पोचायला तीन वर्षे लागतात.

तिथे ते ओढ्यामध्ये, तलावांमध्ये शिरतात.

पोचेपर्यंत ते अडीच इंच लांबीचे झालेले असतात.

त्यांना 'एलवर्स' असे म्हणतात.





त्यातले नर ईल इथे जवळजवळ सहा वर्षे राहतात.

तोपर्यंत 1 - 1.5 फूट लांब होतात.

मादी ईल इथे बारा वर्षे राहतात.

त्या तब्बल पाच फूट लांब होतात.

वाढ पूर्ण झाल्यावर ते स्थलांतर करण्यासाठी सज्ज होतात.

ईल काहीही करून समुद्राकडे पोहत जातात.

तळ्यांत राहणारे ईल तर जमिनीवरूनही प्रवास करतात.

पाऊस पडून गेला की रात्रीच्या वेळी

ओल्या गवतावरून घसरत ते एखादा ओढा गाठतात.

शेवटी एकदाचे ते समुद्रात पोचतात.

सरगासो समुद्राकडे पुनः पोहत जातात.


ही अंतर सहा हजार मैलाचेही असू शकते!

सरगासो समुद्रात वयात आलेले नर ईल संभोग करतात.

मादी ईल अंडी घालतात.

नवीन ईल जन्माला येतात.

ही पिल्ले लवकरच गोड्या पाण्याकडे जाण्याचा दीर्घ प्रवास सुरू करतील.





हिरवे कासव हा सर्पटणाऱ्या प्राण्यांपैकी एक.

समुद्रकिनाऱ्यावर घातलेल्या अंड्यामधून पिल्ले बाहेर येतात.

असेनशन बेटावर त्यांची अंडी सापडतात.

हे अटलांटिक महासागरातले एक छोटेसे बेट आहे.

अंड्यातून बाहेर आल्यावर कासावाची पिल्लं घरट्यातून बाहेर पडतात.

आणि थेट समुद्राकडे चालू लागतात.

समुद्र त्यांना ब्राझील पर्यंत घेऊन जातो.

यात अनेक महीने जातात.

कासवे समुद्रातले छोटे छोटे प्राणी खातात.

ब्राझीलला पोचल्यावर 'टरटल ग्रास' नावाचे गावात शोधतात.

हे त्यांचे आवडते अन्न आहे.

विणीचा हंगाम आला की, म्हणजे दर २-३ वर्षांनी कासवे बेटावर परत येतात.

इतर वेळ ती ब्राझीलमध्येच राहतात.

असेशन बेट फक्त ७ मैल रुंद आहे आणि ब्राझील पासून १४०० मैल लांब आहे.

एखाद्या मुरलेल्या खालश्याला देखील हे बेट सापडणे कठीण आहे.


मग ही कासवे हे बेट कसे काय शोधून काढतात?

कासवे पाण्याच्या वरच्या भागात पोहतात.

त्यांना आकाश दिसते.

सूर्य, तारे त्यांना वाट दाखवतात.

बेट जवळ आल्याचे त्यांना लगेच समजते.



मादी कासव बेटावर आली की वाळूत नाक खुपसते.

वाळूचा वास घेते.

वाळूचा स्पर्श बघते.

या सर्व गोष्टी तिला तिचे जन्मस्थान शोधायला मदत करतात.

किनाऱ्यावर आली की दर वेळी ती साधारन् १०० अंडी घालते.


आयुष्यभरात तो ३-७ वेळा किनाऱ्यावर येते.

आणि पोहत ब्राझीलला जाते.

दोन महिन्याने पिल्लं बाहेर येतात.

आणि ब्राझील पर्यंतचा रस्ता आपापला शोधून काढतात.





अनेक सस्तन प्राणीही स्थलांतर करतात.

काही सस्तन प्राणी जमिनीवर राहतात.

इतर समुद्रात राहतात.

कॅलिफोर्निया ग्रे व्हेल समुद्रात राहणारे सस्तन प्राणी आहेत.

जानेवरी आणि फेब्रुवरी मध्ये ते पिल्लांना जन्म देतात.

कॅलिफोर्निया आणि मेक्सिको जवळच्या कोमट पाण्यात पिळलांचा जन्म होतो.

पिल्ले दूध पिऊन बाळसे धरतात.

शरीरातल्या स्निग्ध पदार्थ त्यांना गरम राहायला मदत करतात.



मार्च पर्यंत पिल्ले प्रवास करण्याइतपत मोठी होतात.

आणि मग सर्व व्हेल ६००० मैलाचा प्रवास सुरू करतात.

या प्रवासाला तीं महीने लागतात.

व्हेल बेरिंग समुद्राकडे जात आहेत.


प्लँक्टन नावाचे समुद्री गावात हे त्यांचे अन्न असते.


व्हेल क्रिल नावाचे छोटे समुद्री प्राणीही खातात.

क्रिल थंड पाण्यात असतात. बेरिंग समुद्र आर्क्टिक प्रदेशात आहे.

तिथे खूप थंडी असते.

व्हेलना इथे भरपूर अन्न मिळते.





उन्हाळ्याच्या काळात व्हेल खाऊन जाड जूड होतात.

थंडी सुरू झाल्यावर ते पुनः दक्षिणेकडे प्रवास करतात.

नवीन बाळांना जन्म देण्यासाठी!

व्हेल आपला रस्ता कसा शोधतात?

व्हेलना खूप उत्तम ऐकू येते.

पण्यातले प्रतिध्वनी ऐकून ते रस्ता शोधतात.

रेनडीअर हे स्थलांतर करणारे जमिनीवरचे सस्तन प्राणी आहेत.

ते लॅपलँड मध्ये राहतात.

तिथल्या लोकांना 'समित' असे म्हणतात.

काही समित रेनडीअर बरोबर राहतात.

रेनडीअरचे कळप पाळतात.

रेनडीअरचा उपयोग अनेक गोष्टींसाठी करून घेतात.


जड सामान ओढून, वाहून नेण्यासाठी.

दूध आणि मांस मिळवण्यासाठी.

रेनडीअरच्या कातडीपासून तंबू, बूट आणि कपडे तयार करतात.

रेनडीअर वर्षातून दोनदा स्थलांतर करतात.

समित लोकही स्थलांतर करतात.



हिवाळ्यात रेनडीअर पठारावर राहतात.

बर्फाखालचे ‘लिचेन’ खातात.

रेनडीअर पायाने बर्फ उकरतात.

लिचेन ला ‘रेनडीअर मॉस’ असेही म्हणतात.


वसंत ऋतू आला की रेनडीअर डोंगरावर जातात.

२०० मैलाचा हा प्रवास!

रेनदीरची डोंगरात पिल्लांना जन्म देतात.

तिथले ताजे कोवळे गवत खातात.

शरद ऋतूत रेनडीअर आणि समित पुनः आपल्या हिवाळी घरी परत येतात.





रेनडीअर आणि समित एकमेकांवर अवलंबून आहेत.

समित लोक रेनडीअर ना क्षार देतात. आग लावून किडे पळवून लावतात.

लांडगे रेनडीअरच्या कळपाचा पाठलाग करतात.

म्हातारे, आजारी रेनडीअर हे लांडग्यांचे अन्न.

रेनडीअरच्या कळपाने स्थलांतर केले की लांडगेही त्यांच्या मागे जातात.

लांडग्यांमुळे रेनडीअरचे कळप बळकट राहतात.



अनेक प्राणी स्थलांतर करतात.


पूर्वी हजारो प्राण्यांची केलेल्या घरांमध्ये घर करतात, चाललेल्या वाटांवरून जातात.

प्राण्यांना जन्मतःच स्थलांतर कसे करायचे हे ठाऊक असते.

आपली इंद्रिये वापरुन ते वाट शोधतात.

वास, चव, दृष्टी, स्पर्श आणि आवाज सर्व महत्त्वाचे आहे.





प्राणी कधी हवामानामुळे स्थलांतर करतात.

कधी पिल्लांना जन्म देण्यासाठी,

कधी अन्न शोधण्यासाठी,

तर कधी एक जागेवर राहून गरज पूर्ण होऊ शकत नाहीत म्हणून स्थलांतर करतात.

प्राणी जगण्यासाठी स्थलांतर करतात.

समाप्त